◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

अपराध

शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात



शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात!

एक लाखांची मागणी, तडजोडीनंतर ९५ हजारांची लाच स्वीकारल्याचा आरोप; एसीबीची कारवाई, न्यायालयाकडून पोलीस कोठडी

पुणे प्रतिनिधी | 17 नोव्हेंबर 2026

शिरूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस हवालदाराविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई केली आहे. दाखल गुन्ह्यात अटक न करण्यासाठी तसेच तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात तक्रारदाराकडे एक लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप संबंधित पोलीस हवालदारावर आहे. तडजोडीनंतर ९५ हजार रुपये स्वीकारल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून कारवाई केली. या कारवाईमुळे शिरूर पोलीस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार सतीश नाथराव मुंढे (वय ४५) यांच्याविरोधात लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती. तक्रारदाराविरोधात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी तसेच तपासात मदत करण्यासाठी मुंढे यांनी एक लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

३० सप्टेंबर रोजी लाच मागणीची पडताळणी

तक्रारीच्या अनुषंगाने ३० सप्टेंबर २०२६ रोजी लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. यावेळी मुंढे यांनी तक्रारदाराला शिरूर पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या टाकळी हाजी पोलीस चौकी येथे बोलावले. पंचांसमक्ष सुरुवातीला एक लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यानंतर तडजोड होऊन ९५ हजार रुपये देण्याचे ठरल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले.

एसीबीचा सापळा; ९५ हजार रुपये स्वीकारल्याचा आरोप

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. या कारवाईदरम्यान मुंढे यांनी पंचांसमक्ष तक्रारदाराकडून ९५ हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. मात्र, सापळा पथकाची चाहूल लागताच त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम आणि तक्रारदाराविरोधात दाखल असलेल्या गुन्ह्याची कागदपत्रे घेऊन घटनास्थळावरून पळ काढला होता.

१६ नोव्हेंबर रोजी अखेर ताब्यात

या प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८७०/२०२६ नुसार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ आणि भारतीय न्याय संहिता कलम २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील आरोपी सतीश नाथराव मुंढे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथील तपास अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास हेटेकर यांनी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजून २५ मिनिटांनी शिरूर नगरपरिषद परिसरातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना अटक करून शिरूर येथील विशेष न्यायालयात अतिरिक्त सत्र न्यायाधीशांसमोर हजर करण्यात आले.

२० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

न्यायालयाने आरोपी मुंढे यांना २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, लाचेची रक्कम, घटनाक्रम आणि संबंधित कागदपत्रांबाबत तपास यंत्रणा अधिक माहिती घेत आहे.

या कारवाईचे तपास अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक सुहास हेटेकर काम पाहत असून, पोलीस उपअधीक्षक सतीश वाळके यांच्या पर्यवेक्षणाखाली तपास सुरू आहे. तसेच पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आणि अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या या कारवाईमुळे शासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचाराविरोधात पुन्हा एकदा कठोर संदेश गेला आहे. कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतील कर्मचाऱ्यांवरच लाच मागणीचे आरोप झाल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणातील पुढील तपासात आणखी कोणते खुलासे होतात, याकडे शिरूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

— Anil Mallav, पुणे

थकीत रकमेवरून ठेकेदाराचा संताप; सार्वजनिक बांधकाम विभागात खुर्ची उगारल्याने खळबळ.....!



विभागीय प्रतिनिधी

जळगाव

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उत्तर विभागातील कार्यालयात ठेकेदाराच्या वर्तनामुळे आज चांगलीच खळबळ उडाली. काम पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार मिळणाऱ्या सुरक्षा अनामत रकमेच्या तीन टक्के परताव्यासाठी एका ठेकेदाराने कार्यालयात धाव घेतली होती. मात्र, संबंधित रक्कम देण्यास विलंब होत असल्याने ठेकेदार आणि कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर आक्रमक प्रकारात झाले आणि संतापलेल्या ठेकेदाराने कर्मचाऱ्याची खुर्ची उगारून मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठेकेदाराचे काम पूर्ण झाले असून, नियमानुसार त्याला सुरक्षा अनामत रकमेचा परतावा मिळणे अपेक्षित आहे. यासाठी तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांकडूनही रक्कम देण्याबाबत शिफारस करण्यात आल्याचे सांगितले जाते. असे असतानाही संबंधित रक्कम देण्यास टाळाटाळ होत असल्याने हा वाद उद्भवल्याची माहिती आहे.

या घटनेमुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही काळ कार्यालयात गोंधळाचे वातावरण होते. संबंधित ठेकेदाराला मिळणारी रक्कम प्रलंबित का ठेवण्यात आली, तसेच त्याने कर्मचाऱ्याशी आक्रमक वर्तन का केले, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेश पाटील यांच्या कार्यपद्धतीवरून यापूर्वीही नाराजी व्यक्त करण्यात आल्याचे समजते. त्यांच्या कारभारामुळे अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदार यांच्यात समन्वयाचा अभाव निर्माण झाल्याचा आरोप केला जात आहे. दिवाळीपूर्वी शासनाकडून कंत्राटदारांना देयकांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याची चर्चा असतानाही अनेक ठेकेदारांची बिले अद्याप प्रलंबित असल्याने नाराजी वाढली आहे.

याच पार्श्वभूमीवर आजचा प्रकार घडल्याने विभागाच्या कामकाजावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीही विभागातील काही अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याचे सांगितले जात असताना, आता या नव्या घटनेमुळे विभागातील प्रशासकीय कामकाज आणि ठेकेदारांच्या प्रलंबित देयकांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सदर घटनेबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने अधीक्षक अभियंता प्रशांत सोनवणे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र ते सध्या सुटीवर असल्याची माहिती मिळाली. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आता होत आहे.

— Maheshprasad Ramkrishnaprasad Dixit

अमळनेरात पहाटे कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा; ५७० किलो मांस जप्त, सात जणांविरुद्ध गुन्हा...!!



विभागीय प्रतिनिधी

अमळनेर, दि. १६ : शहरातील पारधीवाडा परिसरात सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यावर पोलिसांनी पहाटे चार वाजेच्या सुमारास धडक कारवाई केली. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना या ठिकाणी जनावरांची कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यांच्या आदेशानुसार पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक समाधान गायकवाड यांच्यासह पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

या कारवाईत पोलिसांनी ३०० किलो गोवंश मांस, १०० किलो म्हशीचे मांस आणि १७० किलो इतर जनावरांचे मांस असा एकूण ५७० किलो मांसाचा साठा जप्त केला. याशिवाय ५० किलो कातडी, शिंगे तसेच २८ कुऱ्हाडी, सुऱ्या व कोयते ताब्यात घेण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ४४ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

छाप्यादरम्यान घटनास्थळावरून इक्बाल कुरेशी आणि बाबा कुरेशी या दोघांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी फरशी रोड, अमळनेर येथील शेख रमजान शेख मुख्तार, अब्दुल अजीज अब्दुल शुकूर, अल्ताफ खान अजीज खान पठाण, सलमान रजा सलीम अहमदखान, शेख मुख्तार शेख बिस्मिल्ला, इक्बाल कुरेशी आणि बाबा कुरेशी अशा एकूण सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला असून नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने जप्त केलेले मांस खड्डा खणून नष्ट करण्यात आले. महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६, प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय निकम करीत आहेत. पहाटेच्या या मोठ्या कारवाईमुळे अमळनेर शहरात एकच खळबळ उडाली असून परिसरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे.

— Maheshprasad Ramkrishnaprasad Dixit

अपराध

घोड धरणातील अवैध वाळू उपशावर प्रशासनाचा धडक प्रहार; ८ सेक्शन आणि ९ फायबर बोटी जागेवरच नष्ट!



घोड धरणातील अवैध वाळू उपशावर प्रशासनाचा धडक प्रहार; ८ सेक्शन आणि ९ फायबर बोटी जागेवरच नष्ट!

पाठपुराव्याला यश; महसूल व पोलीस प्रशासनाची संयुक्त कारवाई, वाळू तस्करांचे धाबे दणाणले!

पुणे प्रतिनिधी : दि. १६ नोव्हेंबर २०२६

शिरूर आणि श्रीगोंदा तालुक्यांच्या हद्दीतील घोड धरण परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाविरोधात प्रशासनाने अखेर मोठी धडक कारवाई करत वाळू तस्करांना जोरदार दणका दिला आहे. शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मसके आणि श्रीगोंदाचे तहसीलदार सचिन डोंगर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग आणि शिरूर पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवत अवैध वाळू उपशासाठी वापरण्यात येणारे तब्बल ८ सेक्शन आणि ९ फायबर बोटी जागेवरच नष्ट केल्या.

विशेष म्हणजे, घोड धरण परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाबाबत शिरूर डॉट कॉमचे पत्रकार तेजस फडके यांनी सातत्याने बातम्यांच्या माध्यमातून आवाज उठवला होता. या अवैध व्यवसायामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून पर्यावरणाचीही हानी होत असल्याचा मुद्दा त्यांनी वारंवार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पत्रकारितेच्या पाठपुराव्यामुळे या गंभीर विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आणि अखेर संबंधित विभागांनी संयुक्त कारवाईचा बडगा उगारला.

गेल्या काही दिवसांपासून घोड धरण परिसरात अवैध वाळू उपशाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. धरणातील पाण्याचा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा गैरवापर करून सुरू असलेल्या या व्यवसायामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसेच शासनाच्या महसुलावरही मोठा परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर महसूल आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तरीत्या मोहीम आखून अवैध वाळू उपशासाठी वापरली जाणारी यंत्रणा उद्ध्वस्त केली.

या कारवाईत ८ सेक्शन आणि ९ फायबर बोटी नष्ट करण्यात आल्याने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे वाळू तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून परिसरात या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे.

पत्रकारितेच्या पाठपुराव्याला प्रशासनाच्या कृतीची जोड!

लोकशाहीमध्ये पत्रकारिता ही केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यापुरती मर्यादित नसून समाजातील चुकीच्या गोष्टींना वाचा फोडणे, प्रशासनाला जनतेच्या प्रश्नांची जाणीव करून देणे आणि सार्वजनिक हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणे हीदेखील पत्रकारितेची महत्त्वाची जबाबदारी आहे. पत्रकार तेजस फडके यांनी घोड धरणातील अवैध वाळू उपशाचा विषय सातत्याने लावून धरल्याने या प्रश्नाला व्यापक प्रसिद्धी मिळाली. राष्ट्रीय पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर घडलेली ही कारवाई म्हणजे जनहितासाठी केलेल्या पत्रकारितेच्या पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित करणारी घटना ठरली आहे.

प्रशासनाने या कारवाईतून स्पष्ट संदेश दिला आहे की, शासनाच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्या आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्या अवैध व्यवसायांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. यापुढेही अशा प्रकारच्या अवैध वाळू उपशावर नियमित लक्ष ठेवून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकंदरीत, घोड धरणातील अवैध वाळू उपशाविरोधात झालेली ही कारवाई केवळ यंत्रणा नष्ट करण्यापुरती मर्यादित नसून शासनाच्या महसुलाचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि जनहितासाठी आवाज उठवणाऱ्या पत्रकारितेच्या ताकदीची जाणीव करून देणारी ठरली आहे.

— Anil Mallav, पुणे

पुण्याच्या भोर तालुक्यात पोलीस पाटील अशोक येनपुरे यांचा धक्कादायक खून



भोर तालुका, पुणे जिल्ह्यातील घोरेपडळ सांगवी गावात पोलीस पाटील अशोक येनपुरे यांचा खून झाल्याची धक्कादायक घटना घडली. रात्री शेतात त्यांचा मृतदेह आढळला, ज्यामुळे स्थानिक रहिवासी धक्क्यात पडल्यात.

तपासणीनंतर असे आढळले की येनपुरे यांच्या डोक्यावर कोयत्यासारखी धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. नातेवाईकांनी त्यांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच भोरच्या राजगड पोलीसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलीसांनी मृतदेह ताब्यात घेऊन सखोल तपास सुरू केला आहे.

हत्येचे नेमके कारण आणि या घटनेत कोणाचा सहभाग आहे, याचा तपास राजगड पोलीस अधिकाऱ्यांनी सुरू ठेवला आहे, ज्यामुळे लवकरच अधिक माहिती मिळण्याची अपेक्षा आहे.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

अपर वर्धा धरणातील मासेमारीच्या दरात कपात; मच्छीमारांमध्ये तीव्र नाराजी



मासेमारीचा पूर्वीचा दर पुन्हा लागू करण्याची मच्छीमारांची मागणी

अपर वर्धा स्थानिक धरणामध्ये मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी मासेमारीचे दर कमी करण्यात आल्याने मच्छीमारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीपासून लागू असलेले दर कमी करून नवीन दर निश्चित करण्यात आल्यामुळे मच्छीमारांच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मासेमारी हा अनेक मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख व्यवसाय असून, त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. अशा परिस्थितीत मासेमारीचे दर कमी केल्याने मच्छीमारांवर आर्थिक संकट निर्माण होऊ शकते, अशी भावना मच्छीमारांकडून व्यक्त होत आहे.

त्यामुळे संबंधित प्रशासनाने मच्छीमारांच्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून पूर्वीप्रमाणेच मासेमारीचे दर पुन्हा लागू करावेत, अशी विनंती मच्छीमारांकडून करण्यात येत आहे.

मच्छीमारांच्या मागणीला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

— अंकुश सुधाकरराव कापसे

कृषि

सोलापूर जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यालयात शेतकरी मोर्चा



सोलापूर जिल्हा अधिकाऱ्यांच्या कार्यालयात शेतकऱ्यांचा मोर्चा आयोजित झाला.

शेतकरी वर्गाने एकत्रितपणे कार्यालयाच्या समोर जमवून आपली मते व्यक्त केली. त्यांच्या मागण्यांची दखल घेण्याची विनंती केली.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

राजनीति

केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच प्रवेशद्वाराचे नामकरण करण्यात आले.



केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच प्रवेशद्वाराचे नामकरण करण्यात आले.

महाराष्ट्राच्या विकासासाठी तसेच पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात स्व. अजित पवार यांनी दिलेले योगदान आणि त्यांच्या कार्यप्रवासाचा वेध घेणारा माहितीपट.

केंद्रीय गृह एवं सहकारिता मंत्री अमित शाह और मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस इनकी प्रमुख उपस्थिती में लोकनेता स्व. अजित पवार इनकी अर्धाकृति पुतले का अनावरण एवं प्रवेश द्वार का नामकरण किया गया।

महाराष्ट्र के विकास के साथ पुणे जिले के सर्वांगीण विकास में स्व. अजित पवार इनका योगदान एवं उनकी कार्ययात्रा को दर्शाने वाली विशेष डॉक्यूमेंट्री...

— Suhas Tagare, पुणे

राजनीति

अमित शाह व फडणवीस यांनी पुणे जिल्हा परिषदेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली



केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुणे जिल्हा परिषदेत आयोजित समारंभात महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण केली.

समारंभात दोन्ही नेते पुतळ्याच्या पायथ्याशी उभे राहून आदरांजली अर्पण करत, शिवाजी महाराजांच्या शौर्य व धैर्याचे स्मरण केले. उपस्थित लोकांनाही या श्रद्धांजलीचे महत्त्व समजावून सांगितले.

या भेटीचा उद्देश महाराष्ट्रातील राष्ट्रीय नेते व राज्य नेते यांच्यातील ऐक्य बळकट करणे आणि सांस्कृतिक वारशाची जपणूक करणे हा होता. दोन्ही नेत्यांनी शिवाजी महाराजांच्या विचारधारेचा सन्मान करीत, सामाजिक व आर्थिक विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन घेण्याचे आश्वासन दिले.

— Suhas Tagare, पुणे

स्वाभिमानीचे राजू शेट्टी व शेतकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठाण मांडून बसले; ऊसाला ३५०० रुपये भाव द्यावा यासाठी



सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठाण मांडून बसले आहेत.

जोपर्यंत सोलापूर जिल्ह्यातील कारखानदार ३५००+१००+२००=३,८०० रूपये जाहिर करत नाहीत, तोपर्यंत माघारी न जाण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे.

— Suhas Tagare, सोलापुर

स्थानीय

कुयफाटा येथे अंजनी ट्रॅव्हल्सला भीषण आग, प्रवासी सुखरूप, सामान जळून खाक



कुयफाटा : नागपूरहून घोटकडे नेहमीप्रमाणे येणाऱ्या अंजनी ट्रॅव्हल्सच्या वाहनाला कुयफाटा येथे भीषण आग लागल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अंजनी ट्रॅव्हल्सची सायंकाळी ४:३० ची गाडी (गाडी नं. MH 12 KQ 1610) नागपूरवरून घोटकडे येत असताना कुयफाटा येथे अचानक आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. आगीने काही क्षणातच संपूर्ण वाहनाला वेढा घातला.

सुदैवाने यात कोणताही प्रवासी जखमी झाला नाही. सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र प्रवाशांचे सामान आगीत जळून खाक झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशमन दलाने आग विझवली. तोपर्यंत वाहन पूर्णपणे जळून गेले होते.

आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस पुढील तपास करत आहेत.

— DOCTOR PINTU PAUL

धर्म

वडछील येथे भजन संध्या व महाप्रसाद थाटात संपन्न



वडछील येथे परमार्ग सेवा आश्रमात भजन संध्या व महाप्रसाद थाटात संपन्न.

जय श्री कृष्ण महानुभाव परिषदद्वारे संचालित परमार्ग सेवाश्रम, वडछील.

शहादा : वडछील येथील नूतन परमार्ग सेवा आश्रमात दि. १५/११/२०२६ रोजी रविवारी परिषदेचे नूतन संचालक श्री सुभाष उद्धव पाटील (भागापूर) यांच्या तर्फे आयोजित भजन संध्या व महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न झाला.

दुपारी १ ते ५.३० वाजता 'महदंबा महिला भजनी मंडळ' (लोणखेडा) या मंडळाची भजन संध्या झाली. त्यानंतर सायंकाळी ६ ते ७ वाजता सर्व भक्तांसाठी भोजन प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. रात्री ८.३० ते ११.३० वाजता 'श्री कृष्ण आत्रेय भजनी मंडळाची' भजन संध्या झाली. भजनाने संपूर्ण भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांना दंडवत प्रणाम.

वडछील येथे भजन संध्या व महाप्रसाद थाटात संपन्न.

— Ashok Patil

स्थानीय

प्रकाशा येथील सद्गुरू धर्मशाळामध्ये समस्त लेवा पाटीदार गुजर समाजाचे वार्षिक अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न; विविध विषयावर चर्चा..

प्रकाशा येथील सद्गुरू धर्मशाळामध्ये समस्त लेवा पाटीदार गुजर समाजाचे वार्षिक अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न; विविध विषयावर चर्चा..

अधिवेशन दि. 15 नोव्हेंबर 2026 वार रविवार रोजी सकाळी दहा वाजता प्रकाशा येथील सद्गुरू धर्मशाळा या ठिकाणी समस्त लेवा पाटीदार गुजर समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक पुरुषोत्तम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या अधिवेशनात समाजहिताचे विविध ठराव मंजूर करण्यात आले. सर्वप्रथम माँ अन्नपूर्णा, स्व. अण्णासाहेब पी.के.पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून अधिवेशनाला सुरुवात झाली. समाजाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा कै.कमलताई पाटील तसेच समाजातील मृत झालेल्या समाजबांधव तसेच देशपातळीवर थोर दिवंगत व्यक्ती यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी अधिवेशनात समाजाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पुरुषोत्तम पाटील, सौ.जयश्रीबेन उर्फ कांचनबेन पाटील, उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई पाटील, मंगलाबेन चौधरी, विमलबेन चौधरी, डॉ सविता पाटील, रामचंद्रभाई पाटील, उपाध्यक्ष सुनीलभाई पटेल, मोहनभाई चौधरी, जगदीशभाई पटेल, रविंद्रभाई गुजर, सुनीलभाई पाटील, डॉ सतीशभाई चौधरी, सुभाषभाई पटेल, शितलभाई (मुन्नाभाई) पटेल, डॉ लतेशभाई चौधरी, राकेशभाई पाटील, मोहनभाई पटेल, गोविंदभाई पाटील, राजारामभाई पाटील एडवोकेट प्रभाकर चौधरी, डॉ वसंतभाई चौधरी, दीपकनाथ पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी समाजाचे जनरल सेक्रेटरी सुनीलभाई पाटील यांनी मागील सभेचे प्रोसिडिंग वाचन केले व जमा झालेल्या खर्चाचे वाचन केले. त्यानंतर विविध विषयांवर चर्चा करण्यात आली त्यात कार्यक्रमात होणारे खर्च यावर नियंत्रण ठेवावे. यावेळी किशोर पटेल (शहादा), डॉ सविता पाटील (नंदुरबार), गिरिशभाई पाटील, उत्तमभाई पाटील (धुरखेडा), सचिनभाई पाटील (मामा मोहिदा), जगदीशभाई पाटील (मामा मोहिदा), डॉ लतेशभाई चौधरी (बारडोली), सौ.धनश्री पाटील (पुणे), महेंद्रभाई पाटील (तळवे), प्रा.ईश्वर पाटील (शहादा), डॉ वसंतभाई चौधरी (करजकुपा), दीपकनाथ पाटील (नाशिक), निलेशभाई पाटील (मलोणी), डॉ प्रफुल्ल पाटील (शिवपूर-औरंगपूर) आदीनी मनोगत व्यक्त केले. बालकलाकार हीत याने गुर्जरी गाथा लोकगीत यावर गीत सादरीकरण केले. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी त्याचा उत्कृष्ट गीत गायनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समस्त लेवा पाटीदार गुजर समाजाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा पदी सर्वानुमते सौ.जयश्रीताई (कांचनताई) दीपकभाई पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात गुजर बोली भाषेचा समावेश करण्यात यावा यासाठी सर्वानी मिळून प्रयत्न करावा असे डॉ सविता पाटील यांनी विनंती केली. गुजर समाजाचे भाट दादा राजस्थान किशनगढ येथील लक्ष्मणभाई बारोट हे दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ पासून प्रकाशा येथील सद्गुरू धर्मशाळा येथे उपस्थित राहणार असून समाजबांधवांनी आपल्या परिवाराची नोंद करून घ्यावी. समाजाचे १८ नियम व ठराव सर्व समाजबांधवानी त्याचे पालन करावे. विविध क्षेत्रात यश व प्राविण्य संपादन केलेल्या समाजातील युवक युवती यांचे समाजाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.जयश्रीताई (कंचनताई) दीपकभाई पाटील व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यात कुमारी सेजल जितेंद्र पाटील, रा.पुसनद, ह.मु.इंदौर (मध्यप्रदेश सिनियर नेटबॉल संघाच्या कर्णधार पदी निवड), कु.दक्ष सुरेश पाटील, रा.करजकुपा (इंग्रजी प्री-इंटरमीजिएट परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम), कु.अनुज उज्वल पाटील, रा.पळासवाडा, ह.मु.अंकलेश्वर (रेलिक्स ऑफ डेस्टिनी पुस्तकाचे लेखक), कुमारी धनवी नीरज पाटील रा.प्रकाशा ह.मु.सुरत (गुजरात बास्केटबॉल संघात निवड), डॉ महेशकुमार प्रकाश पाटील, रा.विद्याविहार, ह.मु.बडोदा (२०२५-२०२६ मध्ये स्टॅनफोर्ड एल्सीव्यर यांच्या जगातील टॉप २% शास्त्रज्ञानाच्या यादीत स्थान), डॉ काजल शरद पाटील, रा.टाकरखेडा, ह.मु.मुरली मनोहर कॉलोनी मलोनी (विद्यापीठ गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक, गोल्ड मेडल प्राप्त - मास्टर ऑफ फिजियोथेरपी), कुमारी तन्वी महेंद्र पटेल, रा.विद्याविहार, ह.मु.इंदौर (२०२५-२६ मध्ये सीए परीक्षा उत्तीर्ण), कु.मयूर सखाराम पाटील, रा.बामखेडा (एमपीएससी तर्फे घेण्यात आलेली महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा उत्तीर्ण व राजपत्रित कृषी अधिकारी वर्ग २ या पदी कृषी विभागात निवड), कु.श्रेयस मनोजकुमार पाटील, रा.कळमसर मोहिदा, ह.मु.अंकलेश्वर प्रदान), कु.ध्रुवील अनिल पाटील, रा.पिंगाणे, एच.मु.शिरपूर (नीट परीक्षेत ६६० गुण मिळवित एआयआयएम्स रायपूर येथे एमबीबीएस साठी प्रवेश), कु.स्वराज कमलेश पाटील, रा.लांबोळा, ह.मु.पुणे (लंडन येथे संपन्न झालेल्या भारत महोत्सव येथे "भारत कला साहित्य सन्मान" पुरस्कार प्राप्त), कु.गुरुराज योगेश्वर पाटील, रा.रायखेड, ह.मु. नाशिक (जेईई मेन्स मध्ये ४१८ रॅंक तर जेईई एडवांस मध्ये ८१४ रॅंक प्राप्त करून आयआयटी कानपूर येथे बी.टेक कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंगमध्ये प्रवेश), कुमारी हितांशी किशोर पटेल, रा.पिसावर, ह.मु.अहमदाबाद (अंडर १७ ते १९ वयोगटातील राष्ट्रीय फुटबॉल संघात निवड), कुमारी प्रनिका प्रफुल्ल पाटील, रा.शिवपूर-औरंगपूर (अबॅकस क्षेत्रातील तिच्या उल्लेखनीय कामगिरीची नोंद "इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स" तसेच "नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स" मध्ये नोंद तसेच उत्कृष्ट बुद्धिबळ खेळाडू), कु.हित जयभाई पटेल, रा.अहमदाबाद (समस्त लेवा पाटीदार गुजर समाजाच्या या वार्षिक अधिवेशनात "गुर्जरी गाथा लोकगीत सादरीकरण"), श्री मोहनभाई पटेल रा.भरूच, डॉ लतेश चौधरी, रा.बारडोली तसेच समाजबांधवांसाठी जेवणाची व्यवस्था लहान शहादा येथील श्री राजेंद्र सुदाम पाटील तर मंडपाची व्यवस्था तिखोरा येथील पद्मावती मंडपाचे संचालक श्री श्रीराम छगन पाटील यांचा ही सत्कार करण्यात आला. सामूहिक सत्कारार्थी डॉ भरत नगिन पाटील, रा.कवठळ,ह.मु.शहादा (वरिष्ठ महाविद्यालय, सोरापाडा, अक्कलकुवा येथे उपप्राचार्य पदी नियुक्ती), कु. गितराज नितीन पाटील, रा.प्रकाशा (बी.आर्किटेक्चर, पेपर २ अ, १६२९ रॅंक आणि बी.प्लानिंग, पेपर २ ब जेईई मेन्स मध्ये ८१२ रॅंक प्राप्त) यांचा सामूहिक सत्कार करण्यात आला. तसेच ज्या समाजबांधवांनी शेतकरी मुलांना आपली मुलगी देऊन लग्न लावून दिले आहे त्यांचे ही समाजातर्फे अभिनंदन करण्यात आले. वार्षिक अधिवेशनात समाजाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील यांनी सांगितले की, समाज संघटन मजबूत करण्यासाठी सर्वानी प्रयत्न करावे. समाजकारण करताना त्यात आपण कधीही राजकारण आणत नाही. समाजातील शेवटच्या घटकाचा सामाजिक उत्थानासाठी समाजाने नियम बनविले आहेत त्यासाठी सर्वांनीच ते स्वीकारले पाहिजे. आपली बोली भाषा विसरता कामा नये. सर्वानी आपली बोली भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा. समाजबांधवानी संघटित राहावे यासाठी प्रयत्न करावेत तसेच समाज कसा पुढे जाईल यासाठी प्रयत्न करावेत. स्व. अण्णासाहेबांनी सर्वांना सोबत घेऊन समाज कार्य करावे असे सांगितले होते. गुजर समाज हा शेतीप्रधान समाज आहे. समाजातील संघटन बळकट करून शेती करणाऱ्या मुलांना लग्नासाठी मुली द्याव्यात. समाजातील तरुण मुला-मुलींनी आधुनिक युगात विविध क्षेत्रात कार्य करावे. समाजाला एकजूट करून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रित येऊन कार्य केले पाहिजे. यावेळी समाजातील नागरिकांनी समाजासाठी तसेच सद्गुरू धर्मशाळा साठी दान दात्यानी देणग्या जाहीर केल्या. या अधिवेशनात अनिल अशोक पाटील,राजाराम नथ्थु पाटील,जगन्नाथ पाटील,दिलीप ज्ञानदेव पाटील,विनोदचौधरी.राजाराम दगडू पाटील,प्रवीण पाटील,रमाकांत (लड्डूभाई) पाटील,उपनगराध्यक्षा सौ.माधवीताई पाटील, मंगलाबेन चौधरी, विमलबेन चौधरी, जयप्रकाश पाटील, प्राचार्य डॉ.पी.एल. पटेल, भरत पाटील, जयदेव पाटील,कन्हैयालाल भुता पाटील,विलास पाटील,गणेश पाटील,यशवंत पाटील ,आदी उपस्थित होते. या वार्षिक अधिवेशनात आलेल्या सर्व समाजबांधवांसाठी जेवणाची व्यवस्था लहान शहादा येथील राजेंद्र सुदाम पाटील यांच्याकडून करण्यात आली होती. तर पुढील वर्षासाठी जेवणाची व्यवस्था शहादा येथील श्री अंकुर अंबालाल पाटील यांच्यातर्फे करण्यात येणार आहे. यावेळी समाजाच्या वार्षिक अधिवेशनात मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. अधिवेशनाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. अधिवेशनाचे सूत्रसंचालन व आभार समाजाचे जनरल सेक्रेटरी सुनील पाटील यांनी क

— Ashok Patil

मुरबाड तालुक्याचा ४९ वा 'श्रीक्षेत्र आळंदी पायी दिंडी सोहळा २०२६' येत्या २३ नोव्हेंबरपासून प्रारंभ; भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन..



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

मुरबाड विशेष वार्तापत्र

जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे. सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड

दिनांक: १६/११/२०२६.

मुरबाड तालुक्याचा ४९ वा 'श्रीक्षेत्र आळंदी पायी दिंडी सोहळा २०२६' येत्या २३ नोव्हेंबरपासून प्रारंभ; भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन

मुरबाड (प्रतिनिधी):

अखिल मुरबाड तालुका पारमार्थिक शेतकरी समाज, मुरबाड (जि. ठाणे) यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ४९ व्या 'श्रीक्षेत्र आळंदी पायी दिंडी सोहळा - २०२६' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विश्व माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या दर्शनासाठी निघणाऱ्या या भक्तिमय पायी दिंडी सोहळ्यात तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन स्वानंद सुखाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

दिंडी सोहळ्याचे वेळापत्रक:

• प्रारंभ: सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ (कार्तिक शु. १४)

• सांगता: रविवार, दिनांक ०६ डिसेंबर २०२६ (कार्तिक व. १३)

संत परंपरा व मार्गदर्शन:

हा ऐतिहासिक पायी दिंडी सोहळा वै.ह.भ.प. गुरुवर्य विठ्ठल बाबा सरजिने यांच्या प्रेरणेने, वै.ह.भ.प. जगन्नाथ महाराज पवार (गुरुजी) यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. दत्तात्रय महाराज सरजिने यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाविक जनतेच्या सहकार्याने पार पडणार आहे.

आयोजन समिती व पदाधिकारी:

सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अखिल मुरबाड तालुका पारमार्थिक शेतकरी समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी विशेष परिश्रम घेत आहेत. यामध्ये अध्यक्ष ह.भ.प. गोटीराम काळूराम घोरड, उपाध्यक्ष ह.भ.प. अरुण बबन कुर्ले, चिटणीस ह.भ.प. दिलीप जगन्नाथ पवार व ह.भ.प. हरिश्चंद्र उमाकांत जाधव, खजिनदार ह.भ.प. रामचंद्र महादू सासे तसेच सर्व कार्यकारिणी व आजीव सभासद यांचा समावेश आहे.

संत ज्ञानेश्वरांच्या "श्री गुरुसारिखा असता पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ।।" या अभंगवाणीच्या साक्षीने निघणाऱ्या या ४९ व्या दिंडी सोहळ्याची जय्यत तयारी मुरबाड तालुक्यात सुरू झाली आहे.

— Kashinath Desale, ठाणे

जीवनशैली

मुरबाडमध्ये भव्य 'आगरी भवन' उभारण्याची घोषणा; कार्यसम्राट आमदार श्री. किसनजी कथोरे यांची महत्त्वपूर्ण घोषणा



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

विशेष वार्तापत्र

जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले, ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार, मुरबाड

देसले, ठाणे / सह तालुका प्रतिनिधी किशोर पवार, मुरबाड) :

मुरबाड तालुक्यातील आगरी समाजासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बातमी असून, मुरबाडमध्ये समाजाच्या हक्काचे एक भव्य 'आगरी भवन' उभारण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुरबाड विधानसभेचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार श्री. किसनजी कथोरे यांनी केली आहे.

आज मुरबाड येथील माऊली नगरमधील 'कस्तुरी निवास' या आमदार जनसंपर्क कार्यालयात उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी ही घोषणा केली. या भव्य वास्तूच्या उभारणीसाठी लवकरच समाजातील मान्यवर आणि पदाधिकाऱ्यांची एक विशेष बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत आगरी भवनाचा सविस्तर आराखडा तयार करून पुढील कार्यवाहीला वेग दिला जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुरबाड शहरात आगरी समाजाच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी एखादी भव्य वास्तू असणे अत्यंत आवश्यक होते. समाजाची ही प्रलंबित मागणी लक्षात घेऊन लोकप्रिय आमदार श्री. किसनजी कथोरे यांनी हा समाजहिताचा निर्णय जाहीर केल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल अखिल मुरबाड तालुका आगरी समाजाच्या वतीने तसेच वीर हिराजी पाटील आगरी सामाजिक संस्था (छत्रपती संभाजीनगर, मुरबाड) यांच्या माध्यमातून आमदार श्री. किसनजी कथोरे यांचे जाहीर आभार मानण्यात आले आहेत.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

गडचिरोली: आलापल्ली-सिरोंचा महामार्गाची सहा वर्षांपासून दुर्वस्था; खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त



गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली–सिरोंचा राष्ट्रीय महामार्ग (NH-353-C) आणि सिरोंचा–पेंटीपाका महामार्ग (NH-63) यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गेल्या सहा वर्षांपासून या महामार्गाचे बांधकाम रखडल्याने ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, उखडलेला रस्ता आणि सुटी खडी यामुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही, प्रस्तावित १०० किलोमीटरपैकी केवळ १० ते २० किलोमीटरचे काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात असून, निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या खराब रस्त्यांमुळे अपघातांचा धोका प्रचंड वाढला आहे. विशेषतः सिरोंचा–पेंटीपाका मार्गावर खड्डे बुजवण्यासाठी टाकण्यात आलेली सुटी खडी दुचाकीस्वारांसाठी घातक ठरत आहे. पावसाळ्यात चिखल आणि पाणी साचल्याने परिस्थिती अधिकच बिकट होते. या महामार्गावरून प्रवास करण्यासाठी आता पाच ते सहा तास लागतात, ज्यामुळे रुग्णवाहिका, शालेय विद्यार्थी, व्यापारी आणि सामान्य प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. काही प्रवाशांना तर तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमार्गे लांबचा वळसा घ्यावा लागत आहे.

महामार्गाच्या दुर्वस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी चक्काजाम आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती होईपर्यंत अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. नागरिकांनी प्रशासनाला मागणी केली आहे की, रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, कामाच्या गुणवत्तेची तांत्रिक चौकशी करावी आणि दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यातील मोठी दुर्घटना टाळता येईल.

— DOCTOR PINTU PAUL

उत्सवाचा भक्तिमय सोहळा; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन! सुरेंद्र सोनवणे, पुणे प्रतिनिधी | Need 24 News



लोणी (ता. आंबेगाव) : वाळुंजनगर (लोणी) येथे ग्रामदैवत श्री कमळजादेवी उत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कमळजादेवी ग्रामविकास प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ मंडळी वाळुंजनगर यांच्या वतीने हा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे.

उत्सवानिमित्त पहाटे काकड आरती, सकाळी देवीचा अभिषेक, सत्यनारायण महापूजा, दुपारी देवीची काठी मिरवणूक, सायंकाळी हरिकीर्तन आणि त्यानंतर महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्सवाच्या कार्यक्रमानुसार पहाटे ४ ते ६ या वेळेत काकड आरती, सकाळी ६ ते ८ देवीचा अभिषेक, सकाळी ८ ते १० सत्यनारायण महापूजा, दुपारी १२ ते ३ देवीची काठी मिरवणूक, तर सायंकाळी ३.३० ते ५.३० हरिकीर्तन होणार आहे. सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

रात्री ९ ते ११ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. श्री गणेश महाराज शिंदे (उदापूरकर), किल्ले शिवनेरी यांचे कीर्तन होणार आहे. तसेच वाळुंजनगर, खडकवाडी, पैसावस्ती, रानमळा, लोणी, पैसा गलठा आणि वडगावपीर येथील भजनी मंडळांची कीर्तनसाथ लाभणार आहे.

कै. सौ. राधाबाई व स्व. झुंबरशेठ लहाने वाळुंज यांच्या स्मरणार्थ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच फुले, हार-तुरे व मंदिर सजावटीसाठी ग्रामस्थांनी सहकार्य केले आहे.

या उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, भक्तिभाव आणि ग्रामस्थांमधील एकोपा जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. परिसरातील सर्व भाविकांनी उपस्थित राहून श्री कमळजादेवीचे दर्शन घ्यावे व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कमळजादेवी ग्रामविकास प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ मंडळी वाळुंजनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

— Surendra Uttam Sonawane

लोणीत ७० शेतकऱ्यांना तुषार सिंचन संचांचे वाटप; जलसंधारणातून शेतीला नवी दिशा..!



लोणी (ता. आंबेगाव) : वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सिंचनासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने लोणी येथे ७० शेतकऱ्यांना तुषार सिंचन संचांचे वाटप करण्यात आले. लुपिन ह्यूमन वेलफेअर अँड रिसर्च फाउंडेशन, पुणे आणि इलिका पी. बी. व्हर्लपूल किचन अप्लायन्सेस प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'उपजीविका विकासासाठी जलसंसाधन प्रकल्पा'अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक शेतकऱ्याला एक एकर क्षेत्रासाठी सिंचन संच देण्यात आल्याने कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यास मदत होणार आहे.

सध्या परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून पाण्याचे योग्य नियोजन करणे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत तुषार सिंचन पद्धतीमुळे पाण्याची बचत होऊन भाजीपाला तसेच इतर पिकांना कमी पाण्यात प्रभावी सिंचन करणे शक्य होणार आहे. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्यास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

गेल्या दीड वर्षात लोणी गावात आठ सिमेंट बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय गावातील तीन पाझर तलावांमधील गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद शाळा, लोणी आणि उपबाजार समिती मंचर बाजार आवार, लोणी येथे रेन वॉटर हार्वेस्टिंगची कामेही करण्यात आली आहेत. या जलसंधारणाच्या उपक्रमांमुळे पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यास तसेच भूजल पातळी वाढविण्यास हातभार लागत आहे.

तुषार सिंचन संच वितरण कार्यक्रमास लोणी गावचे सरपंच सावळाराम नाईक, शरद बँकेचे संचालक अशोक आदक पाटील, माजी सरपंच उद्धव लंके, जारकरवाडी पंचायत समितीचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते बाळशिराम वाळुंज, उपसरपंच राजेंद्र वाळुंज, पोलीस पाटील संदीप आढाव, भैरवनाथ विद्याधाम लोणीचे शिक्षण समिती सदस्य संतोष पडवळ, रमेश खोमणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी लुपिन फाउंडेशनचे तालुका व्यवस्थापक प्रताप मोटे यांनी तुषार सिंचन संचांचा वापर करून भाजीपाला पिकांना योग्य पद्धतीने पाणी देणे आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन कसे घेता येईल, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. फिनोलेक्सचे रोहित कदम यांनी सिंचन संचांची जोडणी, पाण्याचे नियोजन आणि प्रत्यक्ष वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. लुपिन फाउंडेशनचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी बाळासाहेब बोऱ्हाडे व मच्छिंद्र खरात यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांच्या वतीने उपस्थित अधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. बाळशिराम वाळुंज यांनी उपस्थित मान्यवर व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

जलसंधारण, आधुनिक सिंचन तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या त्रिसूत्रीच्या माध्यमातून लोणी गावात शेतीच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

— Surendra Uttam Sonawane

शिक्षा

भोर, पुणे: शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानने सारोळा व पंचक्रोशीतील धारकांसाठी इतिहास अभ्यासवर्ग आयोजित



पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यात असलेल्या सारोळा गावात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानने धारकांसाठी एक विशेष इतिहास अभ्यासवर्ग आयोजित केला. हा वर्ग धारकांच्या इतिहासाच्या ज्ञानवृद्धीसाठी व राष्ट्रीय कार्यासाठी मार्गदर्शन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला.

वर्गात शिवप्रतिष्ठानचे प्रमुख वक्ते उपस्थित धारकांना छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाची सखोल माहिती देत होते. त्यांनी या इतिहासाचा प्रभावी वापर प्रत्यक्ष राष्ट्रकार्यात कसा करावा, कायदेशीर मार्गाने राष्ट्रकार्य कसे पुढे नेावे याबाबत मार्गदर्शन केले.

या अभ्यासवर्गासाठी सारोळा व पंचक्रोशीतील धारकरी व शिवप्रेमींची मोठी संख्या उपस्थित राहिली. सहभागींच्या उत्साही प्रतिसादामुळे कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

— किरण सदाशिव आंबिके

भोर तालुक्यातील कापूरहोळमध्ये वीर धाराऊ माता येथे दीपोत्सव



पुण्याच्या भोर तालुक्यातील कापूरहोळ गावातील ऐतिहासिक वीर धाराऊ माता स्मारकाजवळ या वर्षी मोठ्या उत्साहाने दीपोत्सव साजरा करण्यात आला. हा उपक्रम स्थानिक ग्रामस्थ व तरुण मंडळाच्या वतीने आयोजित केला गेला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या दूधआई वीर माता धाराऊ गाडे-पाटील यांच्या स्मृतींना सन्मान देण्यासाठी स्मारक व वाड्यावर फुलांची आणि पणत्यांची आकर्षक आरास केली गेली. सायंकाळी स्मारकासमोरील व मंदिर परिसरात लखलखत्या प्रकाशात फुलांच्या रांगोळ्या व पणत्या सजविल्या.

उत्सवाच्या वेळी लखलखत्या दीपांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळला, ज्यामुळे वीर धाराऊ मातांच्या पराक्रम व त्यागाची भावना अधिक बळकट झाली. उपस्थित ग्रामस्थांनी त्यांच्या पराक्रमाला अभिवादन केले.

या प्रकारचा सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम स्थानिक वारसा जतन करण्यास व तरुण पिढीला इतिहासाची जाणीव देण्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

— किरण सदाशिव आंबिके

भडगाव तालुक्यातील बोदर्डे येथे प्रहार दिव्यांग संघटनेच्या शाखेचे उद्घाटन



बोदर्डे येथे प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या शाखेचे उद्घाटन संपन्न

भडगाव, दि. १६ : प्रहार दिव्यांग क्रांती संस्था (रजि.) महाराष्ट्र राज्य अंतर्गत प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, शाखा - बोदर्डे, ता. भडगाव, जि. जळगाव या शाखेचा स्थापना व उद्घाटन कार्यक्रम रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता बोदर्डे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष मा. दिपक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तालुका अध्यक्ष म्हणून करतार सिंग परदेशी तसेच बोदर्डे शाखा कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष अशोक नाना पाटील, उपाध्यक्ष भिकन रामा पाटील, सचिव मधुकर भिला पाटील, खजिनदार अमोल साहेबराव पाटील, सल्लागार अजय चंद्रकांत पाटील

— Vilas Supadu Patil

बाबू जगजीवन राम यांचे राजकीय जीवन आणि सामाजिक योगदान



बाबू जगजीवन राम हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ज्येष्ठ नेते, समाजसुधारक, कुशल प्रशासक आणि दलित समाजाच्या हक्कांसाठी कार्य करणारे प्रमुख राजकीय नेते होते. भारतीय राजकारणात त्यांनी पाच दशकांहून अधिक काळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

जन्म: 5 एप्रिल 1908

जन्मस्थळ: चांदवा गाव, भोजपूर जिल्हा, बिहार.

पूर्ण नाव: बाबू जगजीवन राम.

बनारस हिंदू विद्यापीठातून विज्ञानाचे शिक्षण घेतले.

कलकत्ता विद्यापीठातून पदवी प्राप्त केली.

2. राजकीय जीवनाची सुरुवात

1934 मध्ये अखिल भारतीय रविदास महासभेची स्थापना केली.

अखिल भारतीय दलित वर्ग लीगची स्थापना करून वंचित समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी काम केले.

1936 मध्ये वयाच्या अवघ्या 28 व्या वर्षी बिहार विधान परिषदेचे सदस्य झाले.

1937 मध्ये बिहार सरकारमध्ये संसदीय सचिव म्हणून काम केले.

स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी यांच्या आंदोलनात सहभाग घेतला.

1942 च्या भारत छोडो आंदोलनात सहभाग घेतल्यामुळे त्यांना अटक झाली.

3. केंद्र सरकारमधील महत्त्वाची पदे

कालावधी पद

1946–1952 केंद्रीय कामगार मंत्री

1952–1956 संचार मंत्री

1956–1962 रेल्वे मंत्री

1962–1963 परिवहन व संचार मंत्री

1967–1970 अन्न व कृषिमंत्री

1970–1974 संरक्षण मंत्री

1974–1977 कृषी व सिंचन मंत्री

1977–1979 संरक्षण मंत्री

1979 उपपंतप्रधान

4. हरितक्रांतीमधील योगदान

1967 ते 1970 या काळात अन्न व कृषिमंत्री म्हणून त्यांनी देशातील अन्नधान्य उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न केले. हरितक्रांतीच्या काळात भारताच्या अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली आणि अन्नस्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती झाली.

5. सामाजिक न्यायासाठी योगदान

दलित आणि वंचित समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी प्रयत्न.

सामाजिक समानता आणि शिक्षणाचा प्रसार.

कामगारांच्या हक्कांसाठी कायदे करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका.

अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणासंबंधी घटनात्मक तरतुदींना पाठिंबा.

कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षेसाठी योगदान.

5. सामाजिक न्यायासाठी योगदान

दलित आणि वंचित समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी प्रयत्न.

सामाजिक समानता आणि शिक्षणाचा प्रसार.

कामगारांच्या हक्कांसाठी कायदे करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका.

अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणासंबंधी घटनात्मक तरतुदींना पाठिंबा.

कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षेसाठी योगदान.

6. काँग्रेसमधून बाहेर पडून नवीन राजकीय वाटचाल

1977 मध्ये आणीबाणीनंतरच्या राजकीय परिस्थितीत त्यांनी काँग्रेस पक्ष आणि मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. 2 फेब्रुवारी 1977 रोजी त्यांनी काँग्रेस फॉर डेमोक्रसी या पक्षाची स्थापना केली. पुढे हा पक्ष जनता पक्षात विलीन झाला.

1979 मध्ये त्यांनी भारताचे उपपंतप्रधान म्हणूनही काम केले.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

डोंबिवलीत १४ वर्षीय कु. ट्विंकल महेश खत्री ही १२ नोव्हेंबरपासून बेपत्ता आहे



डोंबिवली येथे १४ वर्षे वयाची कु. ट्विंकल महेश खत्री 12 नोव्हेंबर 2026 रोजी दुपारी 2 वाजल्यापासून जुनी डोंबिवलीतून गायब झाली आहे.

तिच्या बद्दल काही माहिती मिळाल्यास किंवा ती कुठे आढळल्यास कृपया खालील क्रमांकावर त्वरित संपर्क साधा

संपर्क - 8591679312

(आरती महेश खत्री).

— Ramesh Sukhdev Khandagale

धर्म

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त शहाद्यात भव्य रक्तदान शिबीर व गुणवंत गौरव सोहळा संपन्न



क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त शहाद्यात भव्य रक्तदान शिबीर व गुणवंत गौरव सोहळा संपन्न

क्रांतिसूर्य धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीचे औचित्य साधून बिरसा मुंडा चौक, शहादा येथे भव्य रक्तदान शिबीर व आदिवासी गुणगौरव सोहळा २०२६ अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहादा-तळोदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेशदादा पाडवी होते. प्रमुख वक्ते म्हणून सातपुडा पावरा समाज संघाचे (महाराष्ट्र राज्य) संस्थापक अध्यक्ष व मुंबई मंत्रालयातील उपअभियंता इंजि. रवींद्र आर्य आणि 'ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन'चे (मध्यप्रदेश राज्य) अध्यक्ष प्रा. डॉ. विनोद ठाकूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून शहाद्याचे तहसीलदार संभाजी पाटील व पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली.

रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात सामाजिक बांधिलकी जपत अनेक मान्यवर व तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यामध्ये सहाय्यक कृषी अधिकारी सुनील सुळे, नायब तहसीलदार दीपक गवते, नागझिरीचे उपसरपंच सचिन पावरा, संतोष पवार सर, रामदास पावरा व रामसिंग पावरा आदींनी रक्तदान करून समाजप्रबोधनाचा आदर्श घालून दिला.

गुणवंतांचा सत्कार

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा इंजि. रवींद्र आर्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये जंपरोप राष्ट्रीय खेळाडू राहुल सुळे, हॉकी राष्ट्रीय खेळाडू निता ठाकरे, लेखक व कवी संतोष पावरा, प्रा. दिनेश पावरा आणि कु.ड्रॉ.कीर्तिका दिलीप खेडकर ms स्त्री रोग यांचा समावेश होता.

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

तहसीलदार दीपक गवते, तालुका कृषी अधिकारी अनिल निकुम, माजी जिल्हा परिषद सदस्य मदन पवार व धरमसिंग पावरा, नगरसेवक एकनाथ नाईक, पाणीपुरवठा सभापती प्रदीप ठाकरे, नगरसेवक जितेंद्र जमदाळे, नगरसेवक रतिलाल निरगुळे, खेडदिगरच्या माजी सरपंच मंजुळाताई मुसळदे, मनमोडे सरपंच देविदास पावरा, वडगाव सरपंच दिनेश पावरा, दुधखेडा सरपंच रमेश पावरा, सरपंच सुभाष वाघ, कमल पावरा, गृहपाल बबलू मोरे, रक्तदूत अमोल जाधव, घोडसे सर, मंगेश बरडे, जय युवा ब्रिगेडचे शहादा तालुका अध्यक्ष सुनील माळीच, सामाजिक कार्यकर्ते राजू सोनावणे, अनिल चव्हाण, इंजि. महेश रावताळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आयोजन व सहकार्य

हा संपूर्ण कार्यक्रम एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय (नंदुरबार), क्रांतिवीर बिरसा मुंडा स्मारक बहुउद्देशीय संस्था (शहादा) आणि कै. कलावती पाडवी फाउंडेशन (तळोदा) यांच्या संयुक्त विद्यमाने व सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील सुळे, संचालक रामसिंग पावरा, करणसिंग तडवी, सचिन पावरा, रवींद्र ठाकरे सरपंच सुभाष वाघ, रामदास पावरा व रक्तपेढी संक्रमण अधिकारी जिल्हा रुंगानालय नंदुरबार यांनी विशेष परिश्रम घेतले.

— Ashok Patil

स्थानीय

फ्लॅटमध्ये आग लागली, किचन खाक; अग्निशमन दलाने २ बेडरूम व हॉल वाचवले



स्थानीय रहिवासींच्या अहवालानुसार, एका फ्लॅटमध्ये अचानक आग लागली, ज्यामुळे स्वयंपाकघर पूर्णपणे जळून खाक झाले.

आग लवकर ओळखली गेल्यामुळे अग्निशमन दल त्वरित घटनास्थळी पोहोचले आणि तीव्र प्रयत्नांनंतर आग नियंत्रित केली.

दलाच्या कार्यामुळे २ बेडरूम आणि हॉल सुरक्षित राहिले, ज्यामुळे संपूर्ण मालमत्तेचे नुकसान मर्यादित राहिले.

— IMRAN BELIM, औरंगाबाद

मनोरंजन

‘हुंदका एका आईचा’ लघुचित्रपटाने रसिकांच्या काळजाचा घेतला ठाव! तीन आईंच्या वेदनादायी भावविश्वाचे प्रभावी चित्रण; प्रा. विजयकुमार जोरी यांच्याकडून चित्रपटाचे कौतुक!



‘हुंदका एका आईचा’ लघुचित्रपटाने रसिकांच्या काळजाचा घेतला ठाव! तीन आईंच्या वेदनादायी भावविश्वाचे प्रभावी चित्रण; प्रा. विजयकुमार जोरी यांच्याकडून चित्रपटाचे कौतुक!

पुणे प्रतिनिधी | 15 नोव्हेंबर 2026

तृप्ती फिल्म प्रॉडक्शन्स निर्मित आणि श्री. रामदासजी राऊत दिग्दर्शित ‘हुंदका एका आईचा’ या हृदयस्पर्शी लघुचित्रपटाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. समाजातील वास्तव, कौटुंबिक नात्यांमधील बदल, आई-वडिलांच्या भावना आणि आजच्या सामाजिक परिस्थितीचे वास्तविक... (continue)

— Anil Mallav, पुणे